मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पाणी वाहतंय की साबणाचा फेस?

## आळंदीतून वाहणारी इंद्रायणी नदी पुन्हा एकदा फेसाळली



**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

वारकरी संप्रदायाचं श्रद्धास्थान असणारी इंद्रायणी नदी पुन्हा एकदा फेसाळली आहे. हे पाप करणाऱ्या कंपन्यांना राज्य सरकारला पाठीशी घालत असल्यानं हे वेळोवेळी घडतंय. सरकारला वारकऱ्यांपेक्षा अवैधरित्या चालणाऱ्या कंपन्या महत्वाच्या का वाटतात? सत्ताधारी आमदारांनी हिवाळी अधिवेशनात याकडे लक्ष वेधलं तरी त्या कंपन्यांना का वाचवलं जातंय? महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला कधी जाग येणार? असे प्रश्न या निमित्तानं पुन्हा उभे ठाकलेत. वारकरी संप्रदायाचं श्रद्धास्थान असणारी इंद्रायणी नदी पुन्हा फेसाळल्यानं थेट राज्य सरकारच्या भूमिकेवरचं प्रश्न उपस्थित झालेत. पिंपरी चिंचवडमधील अवैधरित्या चालणाऱ्या कंपन्या इंद्रायणीत रसायनयुक्त पाणी सोडतात. त्यांचं हेच पाणी पवित्र गंगेला जीवघेणी बनवत चालले आहे. गेल्या सात वर्षांपासून अनेकदा ही परिस्थिती उद्भवलेली आहे, त्यावेळीच झोपेचं सोंग घेणाऱ्या प्रशासनाला जाग आलेली आहे. इंद्रायणी नदी जेव्हा जेव्हा फेसाळते, तेव्हा तेव्हा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ आणि पिंपरी चिंचवड पालिकेकडून या नदीतील पाण्याचे नमुने अशा पद्धतीने घेतले जातात. त्याचा एक अहवाल ही बनवला जातो आणि कारवाई सुरु असल्याचं भासवलं जातं. रसायनयुक्त पाणी नदीत सोडणाऱ्या कंपन्यांपेक्षा त्याकडे सोईस्करपणे दुर्लक्ष करणारं महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ आणि पिंपरी चिंचवड पालिका सर्वस्वी जबाबदार आहे. सात वर्षांपासून त्यांना जागचं येईना हे पाहून थेट सत्ताधारी आमदारांनी हिवाळी अधिवेशनात सरकारलाचं जाब विचारला. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात सत्ताधारी आमदारांनी याच मुद्द्यावरून राज्यसरकारला धारेवर धरलं. त्यावेळी महाराष्ट्र नियंत्रण मंडळाने यावर खुलासा केला. आम्ही सहा कंपन्या बंद केल्याचं, पिंपरी चिंचवड पालिकेला एसटीपी प्लांट अत्याधुनिक करण्याचं आणि अवैधरित्या चालणाऱ्या गोडाऊनवर कारवाई करण्याचे आदेश दिल्याचं सांगितलं. राज्य सरकारने सुद्धा या खुलाशावर डोळे झाकून विश्वास ठेवला. मात्र आज पुन्हा एकदा इंद्रायणी फेसाळली, त्यावेळी आम्ही यापुढची कारवाई करतो,असं स्पष्टीकरण दिलं. त्यामुळं महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ कारवाईचा कसा करतो, हे सिद्ध झालं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उद्योग मंत्री उदय सामंत या मातब्बर मंत्र्यांना याबाबत माहिती आहे. तरी लाखो वारकऱ्यांचं श्रद्धास्थान असणाऱ्या इंद्रायणी नदीबाबत हे सरकार किती उदासीन आहे. हे वेळोवेळी सिद्ध झालंय. त्यामुळं सरकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळावर जोपर्यंत कारवाई करत नाही. तोपर्यंत वारकऱ्यांच्या जीवाशी सुरु असलेला खेळ असाच सुरु राहणार, हे उघड आहे.

### नदीबाबत सरकार उदासीन

» नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात सत्ताधारी आमदारांनी याच मुद्द्यावरून राज्यसरकारला धारेवर धरलं. त्यावेळी महाराष्ट्र नियंत्रण मंडळाने यावर खुलासा केला. आम्ही सहा कंपन्या बंद केल्याचं, पिंपरी चिंचवड पालिकेला एसटीपी प्लांट अत्याधुनिक करण्याचं आणि अवैधरित्या चालणाऱ्या गोडाऊनवर कारवाई करण्याचे आदेश दिल्याचं सांगितलं. राज्य सरकारने सुद्धा या खुलाशावर डोळे झाकून विश्वास ठेवला. मात्र आज पुन्हा एकदा इंद्रायणी फेसाळली, त्यावेळी आम्ही यापुढची कारवाई करतो,असं स्पष्टीकरण दिलं. त्यामुळं महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कारवाईचा कसा करतो, हे सिद्ध झालं.

# मराठी नाट्य संमेलन मुलांच्या किलबिलाटाने गजबजणार

## क्लाऊन माईम ॲक्ट, बोक्या सांतबंडे, बालगीते, पपेट शो या कार्यक्रमांची रेलचेल

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

१०० वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन, येत्या शनिवारी आणि रविवारी चिंचवडगाव येथील श्री मोरया गोसावी क्रीडा संकुल येथे आयोजित करण्यात आले आहे. या १०० व्या नाट्य संमेलनात प्रथमच लहान मुलांसाठी बालनगरी स्वतंत्रपणे उभारण्यात आली आहे. नाट्य संमेलनाचे आयोजक भाऊसाहेब भोईर यांनी स्वतः या बालनगरीच्या उभारणीसाठी लक्ष दिले आहे. संमेलनाच्या पूर्वसंध्येसह नाट्य संमेलनात दोन्ही दिवस या बालनगरीत लहान मुलांसाठी भरगच्च कार्यक्रम आहेत. बालनाट्य नगरीमधील विविध कार्यक्रमांची निवड प्रकाश पारखी, धनंजय सरदेशपांडे, रुपाली (काठोळे) पाथरे, मयूरी जेजुरीकर, गौरी लोंढे या यांनी केले आहे. ही बालनगरी भोईर नगर येथील मैदानावर असणार आहे. या विषयी माहिती देताना नाट्य संमेलनाचे आयोजक भाऊसाहेब भोईर म्हणाले, आज पर्यंत ९९ नाट्य संमेलन झाली, मात्र यामध्ये लहान मुलांसाठी एखाद दुसरं नाटक किंवा बाल गीतांचा कार्यक्रम व्हायचा. त्यामुळे नाट्य संमेलनात लहान मुलांचा सहभाग हा कमी प्रमाणात दिसायचा. परंतु १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेताना आम्ही जाणीवपूर्वक लहान मुलांसाठी 'बालनगरी' हा एक वेगळा रंगमंच ठेवला आहे. लहान मुलांना बालपणा पासूनच नाटकाची गोडी लागावी, त्यांच्यावर नाटकाचे संस्कार व्हावेत, हा यामागील उद्देश आहे.

पूर्वसंध्येला स्थानिक बाल कलाकारांच्या विविध कार्यक्रमाबरोबरच, सुट्टी गाजवलेले 'बोक्या सांतबंडे' हे व्यावसायिक बालनाट्य, ग्रीप्स थिएटरचे गोष्ट सिंपल पिल्लाची, बालगीते, पपेट शो हे खास मुलांसाठी आकर्षण असणार आहे. तसेच क्लाऊन माईम ॲक्ट हा प्रकार पिंपरी चिंचवड मध्ये पहिल्यांदाच सादर होणार आहे. हे पाहण्यासाठी मनपा शाळांमधील विद्यार्थी, झोपडपट्टी भागात असणाऱ्या शाळांमधील विद्यार्थी यांना आमंत्रीत केले आहे, कारण तिकीट काढून असे कार्यक्रम त्यांना अनुभवता येणार नाहीत. तसेच इतरही लहान मुलं यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होत आनंद लुटतील असा विश्वास भोईर यांनी व्यक्त केला.

# लोकशाही वाचवण्यासाठी शनिवारी पिंपरी मध्ये 'निर्भय बनो' जाहीर सभा!

## डॉ. चौधरी व ॲड. सरोदे यांच्या अभियानांतर्गत सभेचे आयोजन

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
सध्या देशामध्ये जे राजकारण सुरू आहे. त्यामुळे सर्वसामान्य लोकांचे दैनंदिन आयुष्य धोक्यामध्ये आलेले आहे. संविधानाची तोडफोड करत संसदेमध्ये अनेक लोकविरोधी कायदे संमत केले जात आहेत. महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, महिलांवरील अत्याचार, अल्पसंख्याक समुदायांच्या अधिकारांचा संकोच, शेतकऱ्यांच्या वाढणाऱ्या आत्महत्या, दलितांवरील अत्याचार इत्यादी मूलभूत प्रश्नांकडे जनतेचे लक्ष जाऊ नये, म्हणून नको ते मुद्दे पुढे करून सर्वसामान्य लोकांना गुंतवून ठेवण्याचे षडयंत्र सुनियोजित पद्धतीने केले जात आहे.



संसदेमध्ये मूलभूत प्रश्नांवर आवाज उठवणाऱ्या खासदारांना असंविधानिक पद्धतीने निलंबित केले जात आहे. ही परिस्थिती पाहता देशातील लोकशाही धोक्यात आहे असे वाटते या विषयावर जनजागृती करण्यासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांनी निर्भयपणे पुढे येऊन सरकारला प्रश्न विचारण्यासाठी शनिवारी (दि.६ जानेवारी) सायंकाळी सहा वाजता पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे ज्येष्ठ विचारवंत डॉ. विश्वंभर चौधरी व ॲड. असीम सरोदे यांच्या 'निर्भय बनो' अभियानांतर्गत जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती संयोजक व ज्येष्ठ नेते मानव कांबळे यांनी पत्रकार परिषदेतील दिली. बुधवारी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, काँग्रेसचे शहर अध्यक्ष डॉ. कैलास कदम, माजी महापौर संजोग वाघेरे पाटील, माजी नगरसेवक गणेश भोंडवे, मारुती भापकर तसेच ज्येष्ठ नेते प्रताप गुरव, प्रकाश जाधव, चेतन बेंद्रे, गणेश दराडे, नरेंद्र बनसोडे, डॉ. मनीषा गरुड, अनिल रोहम, धनाजी येळकर, सतीश काळे, प्रदीप पवार, प्रवीण कदम, रवी नांगरे, सागर चिंचवडे आदी उपस्थित होते. ॲड. गौतम चाबुकस्वार यांनी सांगितले की, सरकारी उद्योगांचे खाजगीकरण मोठ्या प्रमाणावर होत चालले आहे. कमी पटसंख्येच्या नावाखाली हजारो शाळा बंद करून, बहुजनांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवले जात आहे.

देशातील काही ठराविक भांडवलदारांना आणि गुंतवणूकदारांचे हित साध्य व्हावे यासाठी शेतकऱ्यांच्या आणि आदिवासींच्या जमिनी बेकायदेशीरपणे हस्तांतरित करण्यात येत आहेत. शेतीचे कंपनीकरण करण्याचा घाट घातला जात आहे. कामगारांच्या सुरक्षिततेसाठी करण्यात आलेले कायदे बदलून भांडवलदारांना उपयोगी पडतील असे कामगार कायदे करण्यात येत आहेत. विकासाच्या नावाखाली पर्यावरणाची वाट लावली जात आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून ज्या भारतीय लोकशाहीचा गौरव होतो तीच लोकशाही आता हुकुमशाहीच्या दिशेने प्रवास करत आहे. प्रसार माध्यमांचे स्वातंत्र्य काढून घेतले गेले आहे. या विषयावर जनजागृती करण्यासाठी या सभेचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. कैलास कदम म्हणाले की, देशात आणि राज्यात सर्व समाज घटकात भीतीचे वातावरण आहे. जो कोणी सरकार विरोधात बोलेल त्यांना सीबीआय, आयटीची भीती दाखवून गप्प केले जात आहे. याचा निषेध म्हणून आणि सरकारचा भ्रष्टाचार आणि इंडियाचा विचार घरोघरी पोहोचवण्यासाठी या निर्भय सभेचे आयोजन करण्यात आले आहे. माजी महापौर संजोग वाघेरे पाटील यांनी सांगितले की, सरकारी यंत्रणांचा वापर करून देशातील विरोधी पक्ष संपवण्याची प्रक्रिया बिनदिक्कतपणे सुरू आहे.

# देशसेवेला पाठींबा देण्यासाठी सन्मान पंतप्रधान पदाचा उपक्रम

## नवे वर्ष नमो वर्ष २०२४ संकल्पना पिंपरी चिंचवड महानगरात राबविणार

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
आपला आदर्श.. आपली प्रेरणा.. नवं भारत निर्माण संकल्पक भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या पंतप्रधान पदाच्या कारकिर्दीवर आधारित कार्य, कर्तव्य, विकास, नव संकल्पना, शासन, प्रशासन व दूरदृष्टी नियोजनावर आधारित महाराष्ट्रातील नामांकित मराठी वृत्तपत्रातील छायाचित्र व माहितीच पंतप्रधान ते प्रधानसेवक नरेंद्र मोदी प्रदर्शनाचे आयोजन कलारंग सांस्कृतिक कलासंस्था, पिंपरी चिंचवड यांच्या वतीने प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह कलादालन, पुणे-३३ येथे दि.५,६, ७ जानेवारी २०२४ तीन दिवस करण्यात आले असल्याची माहिती आयोजक अमित गोरखे यांनी दिली आहे. पंतप्रधान ते प्रधानसेवक नरेंद्र मोदी प्रदर्शनाचे उद्घाटन आमदार श्रीकांत भारतीय यांच्या हस्ते दि.०५ रोजी सकाळी १०.३० वाजता प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह कलादालन येथे करण्यात येणार आहे. या प्रदर्शनासाठी भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप, खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, अश्विनी जगताप, उमा खापरे, वर्षा डहाळे, माजी खासदार अमर साबळे, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य सदाशिव खाडे, माजी राज्यमंत्री सचिन पटवर्धन आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. आयोजक अमित गोरखे यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकार म्हटले आहे की, नरेंद्र मोदी हे सिहां सारखी हिंम्मत आणि पहाडा एवढी स्वप्ने घेऊन एका परीपूर्ण भारताची उभारणी करणारा नेता, नेता नव्हे प्रधानसेवक. त्यांच्या नि:स्वार्थी देशसेवेला पाठींबा देण्यासाठी सन्मान पंतप्रधान पदाचा.. गौरव प्रधानसेवक कार्याचा.. नवा वर्ष नमो वर्ष २०२४ संकल्पना आपण पिंपरी चिंचवड महानगरात राबवित आहोत. तत्म्यांच्या संकलनातून आपल्या भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय अधिवेशन गोवा येथील दि.१३ सप्टेंबर २०१३ ते आज पर्यंतच्या प्रकाशित बातम्यांचे वॉल पोस्टर्स व संकलित पुस्तकातून आम्ही भारतीय नागरिकांपुढे प्रदर्शनाच्या माध्यमातून पुढे आणत आहोत.

# बेकायदा बांधकामांची झाडाझडती!

## फसवणूक करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांवर गुन्हे दाखल करणार

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
आंबेगाव बुद्रुक येथील बेकायदा अकरा इमारतींवर कारवाई केल्यानंतर गेल्या तीन वर्षांतील बेकायदा बांधाकामांना दिलेल्या नोटिशी आणि त्यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी मागविला आहे. त्यासाठी नगर अभियंता आणि अतिरिक्त आयुक्तांची समिती स्थापन करण्यात आली असून, पुढील आठवड्यात या सर्व प्रकरणांचा आढावा घेण्यात येणार आहे. तर ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांवर महापालिका गुन्हे दाखल करणार आहे. आंबेगाव बुद्रुक येथील बेकायदा ११ इमारतींवर महापालिकेच्या बांधकाम विकास विभागाकडून कारवाई करण्यात आली होती. बेकायदा बांधकामांना महापालिकेकडून नोटीस बजाविण्यात आल्यानंतरही कारवाई करण्यात आली नव्हती. या पार्श्वभूमीवर



गेल्या तीन वर्षांतील बेकायदा बांधकामांना बजाविण्यात आलेल्या नोटिशींची माहिती मागविण्यात आल्याचे आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी मंगळवारी सांगितले. अतिरिक्त आयुक्त आणि नगर अभियंता यांची समिती नेमण्यात आली आहे. या समितीकडून गेल्या तीन वर्षात किती बांधकामांना नोटिसा दिल्या गेल्या आहेत, याची माहिती घेतली जाणार आहे. त्याचा अहवाल ही समिती १२ जानेवारीपर्यंत सादर करणार आहे. त्यानंतर आढावा घेऊन पुढील कार्यवाही केली जाणार आहे. तसेच फसवणूक करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांवर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे कुमार यांनी सांगितले. सदनिका खरेदी करताना रेरा आणि महापालिकेच्या संकेतस्थळावरून बांधकामाला परवानगी आहे का, याची माहिती घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. नागरिकांची फसवणूक टाळण्यासाठी महापालिकेकडून शहरातील अधिकृत बांधकाम व्यावसायिकांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे, महापालिकेचे कामकाज १०० टक्के ऑनलाइन केले जाणार आहे. सध्या महापालिकेच्या ६० पैकी १६ विभागांचा कार्यभार ऑनलाइन करण्यात आला असून, येत्या दोन महिन्यांत उर्वरित सर्व विभागांचा कारभार ऑनलाइन केला जाणार असून, प्रकरणांची माहिती नागरिकांना मिळणार आहे.तर ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांवर महापालिका गुन्हे दाखल करणार आहे. आंबेगाव बुद्रुक येथील बेकायदा ११ इमारतींवर महापालिकेच्या बांधकाम विकास विभागाकडून कारवाई करण्यात आली होती. बेकायदा बांधकामांना महापालिकेकडून नोटीस बजाविण्यात आल्यानंतरही कारवाई करण्यात आली नव्हती. या पार्श्वभूमीवर गेल्या तीन वर्षांतील बेकायदा बांधकामांना बजाविण्यात आलेल्या नोटिशींची माहिती मागविण्यात आल्याचे आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी मंगळवारी सांगितले. अतिरिक्त आयुक्त आणि नगर अभियंता यांची समिती नेमण्यात आली आहे. आंबेगाव बुद्रुक येथील बेकायदा अकरा इमारतींवर कारवाई केल्यानंतर गेल्या तीन वर्षांतील बेकायदा बांधाकामांना दिलेल्या नोटिशी आणि त्यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी मागविला आहे.

### पालिकेचे कामकाज ऑनलाइन

**» ६० पैकी १६ विभागांचा कार्यभार ऑनलाइन करण्यात आला असून, येत्या दोन महिन्यांत उर्वरित सर्व विभागांचा कारभार ऑनलाइन केला जाणार असून, प्रकरणांची माहिती नागरिकांना मिळणार आहे.तर ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांवर महापालिका गुन्हे दाखल करणार आहे. आंबेगाव बुद्रुक येथील बेकायदा ११ इमारतींवर महापालिकेच्या बांधकाम विकास विभागाकडून कारवाई करण्यात आली होती. बेकायदा बांधकामांना महापालिकेकडून नोटीस बजाविण्यात आल्यानंतरही कारवाई करण्यात आली नव्हती. आंबेगाव बुद्रुक येथील बेकायदा अकरा इमारतींवर कारवाई केल्यानंतर गेल्या तीन वर्षांतील बेकायदा बांधाकामांना दिलेल्या नोटिशी आणि त्यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी मागविला आहे. या पार्श्वभूमीवर गेल्या तीन वर्षांतील बेकायदा बांधकामांना बजाविण्यात आलेल्या नोटिशींची माहिती मागविण्यात आल्याचे आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी मंगळवारी सांगितले. अतिरिक्त आयुक्त आणि नगर अभियंता यांची समिती नेमण्यात आली आहे.**

# बेळगावमध्ये रंगणार राष्ट्रीय रोल बॉल स्पर्धा

## आजपासून स्पर्धेला सुरूवात : पुरूष- महिला ३८ संघांचा समावेश

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
भारतीय रोल बॉल महासंघ व कर्नाटक रोल बॉल संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने २० व्या वरिष्ठ राष्ट्रीय रोल बॉल स्पर्धेचे आयोजन, बेळगाव, कर्नाटक येथे दिनांक ४ जानेवारी ते ७ जानेवारी या कालावधीत करण्यात आले आहे. या स्पर्धे करिता २३ पुरुष संघ – उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, झारखंड, गुजरात, राजस्थान, जम्मू आणि काश्मीर, केरला, रोलर स्पोर्ट्स आणि सोशल अकॅडमी, दिल्ली, आसाम, गोवा, छत्तीसगड, चंडीगड, पंजाब, कर्नाटका, पोंडीचेरी, तेलंगाना, मध्य प्रदेश, वेस्ट बंगाल, हरयाणा, तामिळनाडू, दिव आणि दमन, आंध्रप्रदेश आणि १५ महिला संघ – उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, झारखंड, गुजरात, राजस्थान, जम्मू आणि काश्मीर, केरला, आसाम, छत्तीसगड, कर्नाटका, पोंडीचेरी, मध्य प्रदेश, वेस्ट बंगाल, हरयाणा, तामिळनाडू इत्यादी संघ सहभागी झाले आहेत. या स्पर्धेसाठी



महाराष्ट्र रोल बॉल संघातील खेळाडूंना महाराष्ट्र रोल बॉल संघटनेचे संघटनेचे अध्यक्ष श्री संदीप खर्डेकर व कोथरूड महिला आघाडी अध्यक्ष सौ. अस्मिता करंदीकर, प्रकाशतात्या बालवडकर, लहुजी बालवडकर, सचिव प्रताप पगार यांच्या हस्ते प्लेईंग कीटचे वाटप करण्यात आले. १९ वी राष्ट्रीय स्पर्धा मागील वर्षी स्पर्धा जम्मू आणि काश्मीर येथे घेण्यात आली होती. या स्पर्धे मध्ये पुरुष गटात उत्तर प्रदेश संघाने विजेतेपद मिळाले होते तर महाराष्ट्र संघाला उपविजेतेपद मिळाले होते.महिला गटात विजेता संघ राजस्थान ठरला होता तर उत्तर प्रदेश द्वितीय क्रमांकावर होता.

महाराष्ट्राचा पुरुष संघ – निलेश शिंदे संघ नायक अहमदनगर, अमितेश बोडदे – यवतमाळ, रचित वर्मा – ठाणे, राहुल पाटील – नंदुरबार, आदित्य मगदूम- कोल्हापूर, सिद्धार्थ सोनार – कोल्हापूर, सिद्धार्थ बोंबले, रोहन दाभाडे, प्रठीक साठे, मनीष राठोर, मधुसुधन रत्नपारखी, साहिल खेडेकर (सर्व पुणे) मार्गदर्शक प्रभाकर वडवेराव -पुणे, व्यवस्थापक राजेश चौगुले- कोल्हापूर.

महिला संघ – श्वेता कदम संघ नायक, रेवती हिंगे, वैष्णवी कुलकर्णी, सुहानी सिंग, सई शिंद्रे, सेजल तोटे, सानिया शेळके, वैभवी कदम (सर्व पुणे) मार्गदर्शक प्रियांक पोळ, व्यवस्थापक शुंभांगी कांबळे दोघीही कोल्हापूर.

# मेट्रो लवकरच रामवाडीपर्यंत धावणार

## महामेट्रोने येरवडा स्थानकाच्या प्रवेशद्वाराच्या रचनेत केले काही बदल

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे मेट्रोची रुबी हॉल ते रामवाडी या मार्गावरील सेवा मागील वर्षाच्या अखेरीस सुरू होणे अपेक्षित होते. परंतु, त्यासाठी आता नवीन वर्ष उजाडले आहे. या मार्गाचे काम पूर्ण होत आले असून, मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांचे पथक या आठवड्यात तपासणीसाठी येत आहे. या पथकाकडून आठवडाभर या मार्गाची तपासणी होणार आहे. त्यानंतर खुद्द आयुक्त येऊन पाहणी करणार आहेत. मागील वर्षाच्या अखेरीस रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मार्गाची मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून तपासणी आणि त्यांची मंजुरी घेण्याचा महामेट्रोचा प्रयत्न होता. या गोष्टी मागील वर्षात पूर्ण



करून नवीन वर्षाच्या सुरुवातीला विस्तारित मार्ग सुरू करण्याचे महामेट्रोचे नियोजन होते. मात्र, या मार्गावरील येरवडा स्थानकाचे जिने नगर रस्त्यावर येत होते. महामेट्रोकडून या जिन्यांसाठी खांब उभारणीचे काम सुरू करण्यात आले होते. परंतु, स्थानिक नागरिकांनी वाहतूककोंडी होत असल्याने या कामाला विरोध केला. अखेर महापालिकेने हे जिने दुसरीकडे हलविण्यास महामेट्रोला सांगितले. महापालिकेने सांगितल्यानुसार महामेट्रोने येरवडा स्थानकाच्या प्रवेशद्वाराच्या रचनेत काही बदल केले. या बदलामुळे येरवडा स्थानकाच्या जिन्याचे काही खांब पाडण्याची वेळ महामेट्रोवर आली. आता ते नव्याने उभारण्यात येत आहेत. यामुळे मेट्रोकडून काम पूर्ण होण्यास विलंब झाला. आता काम पूर्ण होत आले असून, मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांचे पथक या आठवड्यात पुण्यात दाखल होत आहे. पथक विस्तारित मार्गाची आठवडाभर तपासणी करणार आहे. या पथकाकडून आयुक्तांकडे अहवाल सादर केला जाईल. त्यानंतर आयुक्त प्रत्यक्ष येऊन या मार्गाची तपासणी करतील. आयुक्तांनी या मार्गाला हिरवा कंदील दिल्यानंतर

> **“ रुबी हॉल ते रामवाडी या विस्तारित मार्गाचे काम पूर्ण झाले आहे. मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून या मार्गाची तपासणी होणार आहे. त्यांनी मंजुरी दिल्यानंतर राज्य सरकार या मार्गावर मेट्रो सेवा सुरू करण्याचा निर्णय घेईल.**
>
> **– हेमंत सोनावणे,**
> **कार्यकारी संचालक, महामेट्रो**

महामेट्रोकडून मार्ग सुरू करण्याबाबत राज्य सरकारला पत्रव्यवहार केला जाईल. त्यानंतर राज्य सरकार मार्ग सुरू करण्याचा अंतिम निर्णय घेईल, अशी माहिती महामेट्रोतील सूत्रांनी दिली. जिल्हा न्यायालय ते स्वारगेट हा भुयारी मार्ग आहे. या मार्गावर बुधवार पेठ, मंडई आणि स्वारगेट ही तीन स्थानके आहे. या मार्गाचे काम पूर्ण झाले असले तरी तिन्ही स्थानकांचे काम सध्या सुरू आहे. ही स्थानके भुयारी असल्याने त्यांच्या कामाला विलंब लागत आहे. हे काम मार्चअखेरपर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली.पुणे मेट्रोची रुबी हॉल ते रामवाडी या मार्गावरील सेवा मागील वर्षाच्या अखेरीस सुरू होणे अपेक्षित होते. परंतु, त्यासाठी आता नवीन वर्ष उजाडले आहे. या मार्गाचे काम पूर्ण होत आले असून, मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांचे पथक या आठवड्यात तपासणीसाठी येत आहे.

# सूसमधील कचराप्रक्रिया प्रकल्पाचे स्थलांतर

## नांदे-चांदे गावाच्या हद्दीत प्रकल्प

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** सूस येथील २०० टन क्षमतेच्या कचराप्रक्रिया प्रकल्पाला विरोध होत असल्याने हा प्रकल्प पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीतील नांदे-चांदे गावात स्थलांतरित करण्यात येणार आहे. या गावातील जागा येत्या काही दिवसांत महापालिकेला मिळणार असून, त्यानुसार पुढील तीन महिन्यांत या प्रकल्पाचे स्थलांतर करण्याचे नियोजन महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून करण्यात आले आहे.

सूस-बाणेर रस्त्यावर ओल्या कचऱ्यापासून सीएनजी तयार करणारा हा प्रकल्प महापालिकेकडून उभारण्यात आला होता. मात्र त्याला विरोध होत होता. स्थानिक नागरिकांकडून तशा तक्रारीही महापालिका प्रशासनाकडे करण्यात आल्या होत्या. सूस रस्त्यावरील लोकवस्तीमध्ये हा प्रकल्प असल्याने तो स्थलांतरीत करावा, यासाठी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणात (एनजीटी) याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवरील सुनावणीवेळी कचरा प्रक्रिया प्रकल्प स्थलांतरित करण्याचा आदेश



न्यायाधिकरणाने दिला होता. या आदेशाविरोधात महापालिकेकडून सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्यात आली आहे. त्यावरील सुनावणी सुरू आहे. मात्र पालकमंत्री अजित पवार, राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, माजी आमदार प्रा. मेधा कुलकर्णी यांनी प्रकल्प स्थलांतरित करण्याची मागणी केली होती. त्यानुसार नांदे-चांदे या गावात कचरा प्रक्रिया प्रकल्प स्थलांतरित करण्यात येणार आहे. नांदे-चांदे गावात अद्यापही मोठ्या प्रमाणावर बांधकामे झालेली नाहीत. त्यामुळे महापालिकेने विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत जिल्हा प्रशासनाला हा प्रस्ताव दिला आहे. त्यानुसार ही जागा निश्चित करण्यात आली आहे. जागा ताब्यात आल्यानंतर दोन महिन्यांत स्थापत्यविषयक कामे महापालिकेकडून स्वखर्चाने केली जाणार आहेत. सूस येथील २०० टन क्षमतेच्या कचराप्रक्रिया प्रकल्पाला विरोध होत असल्याने हा प्रकल्प पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील नांदे-चांदे गावात स्थलांतरित करण्यात येणार आहे. या गावातील जागा येत्या काही दिवसांत महापालिकेला मिळणार असून, त्यानुसार पुढील तीन महिन्यांत या प्रकल्पाचे स्थलांतर करण्याचे नियोजन महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून करण्यात आले आहे.सूस-बाणेर रस्त्यावर ओल्या कचऱ्यापासून सीएनजी तयार करणारा हा प्रकल्प महापालिकेकडून उभारण्यात आला होता. मात्र त्याला विरोध होत होता. स्थानिक नागरिकांकडून तशा तक्रारीही महापालिका प्रशासनाकडे करण्यात आल्या होत्या.